आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२९ ऑगस्ट २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त आज देशभरात राष्ट्रीय क्रीडा दिनाचे कार्यक्रम
- मालवण इथं छत्रपती शिवाजीमहाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणाच्या चौकशीसाठी संयुक्त तंत्रज्ञसमिती नेमण्याचा राज्यसरकारचा निर्णय
- मुंबईच्या वांद्रे टर्मिनसपासून मडगावला जाणाऱ्या नव्या एक्सप्रेस गाडीचं उद्घाटन

  **आणि**
- जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना जारी

**<><><><><>**

हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त आज देशभरात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा होत आहे. केंद्रीय क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी आज सकाळी नवी दिल्लीतल्या मेजर ध्यानचंद राष्ट्रीय मैदानावर ध्यानचंद यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. सर्वांनी आपापल्या रोजच्या कामातून वेळ काढून किमान एक तास काढून, आपल्या आवडीचा एक खेळ खेळावा, असं आवाहन मांडवीय यांनी केलं .

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी क्रीडा दिनानिमित्त समाजमाध्यमांवर दिलेल्या संदेशात, मेजर ध्यानचंद यांना अभिवादन केलं आहे. खेळाबद्दल आत्मियता बाळगणाऱ्या आणि क्रीडाक्षेत्रात देशाचं नाव उंचावणाऱ्या सर्वांचं कौतुक करण्याचा हा दिवस असल्याचं ते म्हणाले.  अधिकाधिक युवकांना खेळण्यास प्रोत्साहन देण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

मालवणजवळ राजकोट इथं छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याच्या निषेधार्थ काल आयोजित निषेध मोर्चाच्यावेळी दोन गटांमधे झालेल्या संघर्ष प्रकरणी ४२ जणांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

शिवसेना (उबाठा) आणि भाजपा नेते नारायण राणे यांच्या समर्थकांमध्ये झालेल्या या संघर्षात किल्ल्याच्या भिंतीचं नुकसान झालं आहे. तणावाच्या परिस्थितीमुळे किल्ल्यावर कडेकोट सुरक्षा व्यवस्था लागू केली आहे. अनुचित घटना टाळण्यासाठी पोलिसांनी उपाययोजना राबवल्या आहेत.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्हात मालवण इथं राजकोट किल्ल्यावरचा छत्रपती शिवाजीमहाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणाच्या चौकशीसाठी संयुक्त तंत्रज्ञसमिती नेमण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. या समितीत बांधकाम अभियंते, आयआयटी मुंबईचे प्रतिनिधी, तसंच नौदलाच्या प्रतिनिधींचा समावेश असेल. याखेरीज राजकोटमधेच छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा नव्याने उभारण्यासाठी देशातले नामवंत शिल्पकार, अभियंते, तज्ज्ञ आणि नौदलाचे प्रतिनिधी यांची तज्ज्ञ समिती नेमण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले आहेत.

दरम्यान, पुतळा कोसळल्याच्या घटनेचा निषेध म्हणून  आज नाशिकमधे पाथर्डी फाटा येथे आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आंदोलन केलं. याप्रकरणी शासनाने घेतलेल्या भूमिकेबाबत देखील तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा पडल्या प्रकरणी कुणालाही माफी नाही, कारवाई होणारच, असं उपमुख्यमंत्री अजीत पवार यांनी म्हटलं आहे. ते आज बीड

इथं राष्ट्रवादी काँग्रेसच्या जनसन्मान यात्रेत बोलत होते. या प्रकरणाची संपूर्ण चौकशी होईल, असं त्यांनी सांगितलं.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, मंत्री धनंजय मुंडे, आणि इतर नेते यावेळी उपस्थित होते.

अजित पवार यांनी आज नांदेड जिल्ह्यात नायगाव इथं काँग्रेसचे दिवंगत खासदार वसंतराव चव्हाण यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचं सांत्वन केलं.

<><><><>

केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे येत्या १ सप्टेंबरला सीडीएस म्हणजेच संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा आयोजित करण्यात आली असून ही परीक्षा सकाळी ९ ते ११, दुपारी १२ ते २ आणि ३ ते ५ या वेळेत घेण्यात येईल. तर एनडीए परीक्षा सकाळी १० ते साडेबारा आणि दुपारी २ ते साडेचार या वेळेत घेण्यात येईल.

<><><><>

मुंबईच्या वांद्रे टर्मिनस पासून मडगावला जाणारी नवी एक्सप्रेस गाडी आजपासून सुरू झाली. केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयुष गोयल यांनी या गाडीला हिरवा झेंडा दाखवून ही गाडी रवाना केली. या कार्यक्रमाला रेल्वे, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव हे दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते. गणेशोत्सवासाठी विशेष गाडी असावी या स्थानिकांच्या मागणीवरून ही रेल्वे गाडी सुरू झाली आहे. यावेळी आशिष शेलार, प्रवीण दरेकर यांच्यासह भाजपचे नेते आणि रेल्वेचे अधिकारी उपस्थित होते.

<><><><>

जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना आज जारी झाली. उमेदवारी अर्ज आजपासून येत्या ५ सप्टेंबरपर्यंत भरता येतील. अर्जांची छाननी येत्या ६ सप्टेंबरला होणार असून उमेदवारी मागे घेण्याची मुदत ९

सप्टेंबरपर्यंत आहे. येत्या २५ सप्टेंबरला मतदान होणार आहे. जम्मू काश्मीर केंद्रशासित प्रदेशातल्या गंदेरबाल, श्रीनगर, बडगाम, राजौरी, पूँछ आणि रियासी या ६ जिल्ह्यात मिळून २६ मतदारसंघांमधे या टप्प्यात निवडणूक होणार आहे. सर्व टप्प्यांची मतमोजणी येत्या ४ ऑक्टोबरला होणार आहे.

**<><><><><>**

जुन्या प्रदूषणकारी व्यवसायिक तसंच प्रवासी गाड्या भंगारात काढून त्याजागी नव्या कमी प्रदुषणकारी गाड्या घेण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने काल दिल्लीत महत्त्वाची बैठक पार पडली. भारत मंडपम् इथं काल झालेल्या बैठकीत रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नीतिन गडकरी यांनी भारतीय स्वयंचलित वाहन निर्माता सोसायटीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाशी संवाद साधला. यावेळी रस्ते वाहतूक आणि महामार्ग राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा आणि अजय टमटा उपस्थित होते. देशभरातून भंगार गाड्या टप्प्याटप्प्यानं बाद करण्यासाठी नवी प्रणाली राबवण्याच्या हेतूनं स्वयंसेवी पद्धतीने वाहनाचे आधुनिकीकरण कार्यक्रम किंवा वाहन भंगारात काढण्याचे नवे धोरण राबवण्याचा निर्णय घेतला आहे. हे नवे धोरण नोंदणीकृत वाहन मोडीत काढण्याची सुविधा आणि स्वयंचलित चाचणी केंद्र यांच्या माध्यमातून राबवले जाईल.

**<><><><><>**

भारतातल्या सार्वजनिक क्षेत्रातल्या कंपन्यांना इंडियन फायनान्शियल सिस्टीम कोडमार्फत आंतरराष्ट्रीय व्यवहारांमध्ये रोखे थेटपणे सूचिबद्ध करता यावेत, या हेतूने अर्थ मंत्रालयाने रोखे करार नियंत्रण नियम १९५६ मध्ये सुधारणा केली आहे. अर्थ मंत्रालयाने याबाबत काल राजपत्रित अधिसूचना जारी केली. या सुधारणेमुळे उदयोन्मुख तसंच तंत्रज्ञान क्षेत्रातल्या भारतीय स्टार्ट अप्स आणि कंपन्यांना जागतिक पातळीवर उपलब्ध भांडवल घेणं सुलभ होणार आहे. त्यामुळे भारतीय कंपन्यांना जगभरातल्या बाजारपेठांमध्ये अधिक संधी उपलब्ध होतील.

**<><><><><>**

भारत स्टार्टअप उद्योगांची मांदियाळी असल्याचं केंद्रीय इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान राज्य मंत्री जितिन प्रसाद यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत डिजिटल भारत इकॉनॉमी कॉन्क्लेव्हला ते संबोधित करत होते. ते म्हणाले की गेल्या १० वर्षात दर ४० मिनिटांनी एक या वेगानं स्टार्टअप उद्योग देशात सुरु झाले आहेत. एकूण एक लाख ४० हजार स्टार्टअप्स पैकी किमान ४५ टक्के उद्योगांचं नेतृत्व महिलांकडे आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता प्रकल्पांसाठी अर्थसंकल्पात १० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त तरतूद असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

आदिवासी क्षेत्रातल्या म्हणजेच पेसा क्षेत्रातल्या भरतीसाठी नाशिकसह राज्यातल्या शेकडो आदिवासींनी काल नाशिकच्या आदिवासी आयुक्तालयावर मोर्चा काढला. आदिवासी भरती होणार नाही तोपर्यंत आंदोलनं सुरुच राहतील असा इशारा यावेळी देण्यात आला. पंचवटीत तपोवन इथून जिल्हाधिकारी कार्यालय आणि तिथून आदिवासी आयुक्त कार्यालयावर काढण्यात आलेल्या या मोर्चात तरुण मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

**<><><><><>**

आंध्रप्रदेशात विशाखापट्टणम इथं पाकिस्तानच्या हेरगिरीप्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेने देशभरात विविध ठिकाणी छापे टाकले. गुजरात, कर्नाटक, केरळ, तेलंगण, उत्तरप्रदेश, बिहार, आणि हरयाणामधे मिळून १६ ठिकाणी ही कारवाई करण्यात आली.

या कारवाईत २२ मोबाईल फोन्स, आणि अनेक गोपनीय कागदपत्रं मिळाली असल्याचं एएनआयने सांगितलं. भारतीय नौदलासंबंधी महत्वाची आणि गोपनीय माहिती चोरणं आणि भारत विरोधी कारस्थान करणं या आरोपांखाली एनआयए ने गेल्यावर्षी दोन जणांवर आरोपपत्र दाखल केलं आहे.

<><><><>

दिल्ली राजधानी क्षेत्रात आज सकाळी ११ वाजून २६ मिनिटांनी भूकंपाचे धक्के जाणवले. रिक्टर मापकावर त्याची तीव्रता ५ पूर्णांक ७ दशांश इतकी नोंदली गेली. भूकंपात जीवितहानी किंवा वित्तहानी झालेली नाही.

<><><><>

अमेरिकन खुल्या ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेत नोव्हाक जोकोविचने तिसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. आर्थर ॲशे स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात त्यानं त्याच्याच देशाचा म्हणजेच सर्बियाच्या लास्लो जेरेचाचा ६-४, ६-४, २-० ने पराभव केला. जोकोविचचा पुढील सामना ऑस्ट्रेलियाच्या ॲलेक्सी पोपिरनशी होणार असून जोकोविचनं गेल्या वर्षभरात पोपरिनला तीन विविध स्पर्धांमध्ये पराभूत केलं आहे.

<><><><>

जम्मू काश्मीरमध्ये दोन वेगवगेळ्या ठिकाणी झालेल्या चकमकीत तीन दहशतवादी ठार झाल्याचं वृत्त आहे. कुपवाडा इथं दोन, तर तंगधार इथं एक दहशतवादी मारला गेला असून, अद्याप चकमक सुरु असल्याचं सुरक्षा दलानं सांगीतलं आहे.

<><><><>

सांगलीतल्या पोलीस अधीक्षक कार्यालयात केंद्रीय संचार ब्युरो आणि सांगली पोलीस यांच्यातर्फे नव्या भारताचे नवीन कायदे या विषयावर आधारित चित्र प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं. अत्यंत चांगल्या पद्धतीनं मराठी भाषेत कायद्यांविषयी माहिती दिली असून तिन्ही कायदे सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या असल्याचं या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी सांगितलं.